**हे वार्तापत्र शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांसाठी आणि शिक्षणात रस असणाऱ्यांसाठी**

**पत्र १, महिना – डिसेंबर २०१६**

**बिडे (कोरकू) = उठा (मराठी)**

# बिडे वार्तापत्र

---

**"तुम्ही शाळा व्यवस्थापन समितीत नाहीत, म्हणून बोलू नका" – अयोग्य भूमिका**

मी अकोट तालुक्यातील एका गावात सायंकाळी ६ वाजता शाळा व्यवस्थापन समितीचा सर्वे करण्यासाठी गेलो होतो. तिथे माझ्या परिचयाचे कोणी नव्हते, म्हणून गावात जो व्यक्ती पहिले भेटेल तो परिचयाचा असे ठरवले. त्यानुसार गावात एका दुकानावर चौकशी केली, "गावात शाळा आहे का?"

तर दुकानदाराने सांगितले, "आहे, एका घरात भरते".

नंतर विचारले की "मग शाळा व्यवस्थापन समिती आहे का?"

तर त्यांना माहित नव्हते म्हणून गावातील एका सुशिक्षित तरुणाकडे ते घेऊन गेले. गावात कुणीही नवीन व्यक्ती आली की लोक या तरुणाला भेटवतात, कारण हा तरुण गावात १२ वी शिकलेला आहे. म्हणजे गावात सर्वात जास्त शिकलेला आहे. त्या तरुणाने सांगितले, "समितीमधील फक्त अध्यक्ष माहित आहे, तर ते सध्या नाहीत." मग मी त्यांना माझा परिचय करून दिला आणि गावात येण्याचे कारण सांगितले. तोपर्यंत गावातील ७, ८ व्यक्ती जमा झाल्या. एका अंगणात आम्ही सर्व बसल्यावर मी माझा परिचय दिला, भेटीचे कारण सांगितले व विचारले, "गावची शिक्षणाची परिस्थिती कशी आहे?" त्यावर गावातील एकजण म्हणाला की "गावातील शिक्षणाची परिस्थिती पाहिजे तशी नाही. आम्हांला मुलांच्या शिक्षणाविषयीच्या प्रगतीबाबत समाधान नाही, कारण मुलांना लिहिता वाचता येत नाही. समितीचे लोक काही बोलत नाही, शाळेत जात नाही." मग मी त्यांना सांगितले, "शाळा गावची आहे, त्यामुळे समितीची जरी मुख्य जबाबदारी असली, तरी गावाचा नागरिक म्हणून आपली प्रत्येकाची जबाबदारी आहे. तुम्हीही शाळेत लक्ष घालायला हवे."

त्यावर एकजण म्हणाले, "आम्हाला माहित आहे की शाळा गावची आहे, पण आम्ही कधी कधी शाळेत जातो, शिक्षकांसोबत चर्चा करतो. तर शिक्षक म्हणतात की **"तुमच बोलायचं काम नाही कारण तुम्ही शाळा व्यवस्थापन समितीत नाहीत."**

सर्वात प्रथम म्हणजे, शाळा व्य. समितीची निवड सर्व पालकांना, गावकऱ्यांना विश्वासात घेऊन झाली असती तर ज्यांना शाळेबद्दल, मुलांच्या शिक्षणाबद्दल विशेष आस्था आहे अशी मंडळी समितीवर येऊ शकली असती. पण तसे घडले नाही. मग अशा वेळी जर कुणी शाळेमधील शिक्षणात रस दाखवत असेल तर त्यांचे स्वागत करणे आवश्यक आहे. गावकरी त्रास देतील असे वाटून न घेता, त्याचा सहभाग घेऊन शाळा कशी चांगली करता येईल असा सकारात्मक दृष्टीकोन ठेवणे अशा ठिकाणी गरजेचे आहे. घरात भरणाऱ्या शाळेचे रुपांतर शाळेच्या इमारतीत

होण्यासाठी गावकऱ्यांचे सहकार्य आवश्यकच राहणार. पालक, गाव मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष देत नाहीत असे एकीकडे म्हणायचे आणि दुसरीकडे मात्र त्यांना शाळेत येऊ द्यायचे नाही. अशाने नुकसान शाळेचे, मुलांच्या शिक्षणाचे होणार आहे, हे सर्वांनी समजून घ्यायला हवंय.

(लेखक - शरद प्रकाश सूर्यवंशी उन्नती संस्थेत पूर्ण वेळ कार्यकर्ता आहे)

**<u>प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम</u>** -

संस्थेने **सप्टेंबर ते डिसेंबर २०१६** या दरम्यान अकोट व तेल्हारा तालुक्यातील एकूण **३१** आदिवासी गावातील शाळा व्यवस्थापन समितींचा सर्वे केला, या सर्वे मधून समितीने आपापल्या गावाची शिक्षणाची परिस्थिती विशद केली. त्याप्रमाणे काही काही गावातील शाळा व काही गावातील शिक्षक यांचे कौतुक समितीने केले, त्यामुळे समितीने, गावकर्यांनी व संस्थेने या चांगल्या शाळांचा व शिक्षकांचा **जानेवारी व फेब्रुवारी २०१७** या महिन्यात **सत्कार** करण्याचे ठरविले आहे. ते यानुसार तेल्हारा तालुक्यातील शाळा - **बोरव्हा** शाळेविषयी व्यक्त केलेले मत, १. शाळा सुंदर आहे २. सर्व शिक्षक चांगलं शिकवतात ३. शाळेतील मुख्याध्यापक **श्री. संदीप विजय जाधव** गुरुजी रविवारीही शाळेत येतात ४. आपल्या मुलांना लिहिता वाचता येतं तसेच शिक्षकांविषयी - **भिली** शाळेचे सहाय्यक शिक्षक **श्री. रवींद्र पुंडलिक सोळंके** व **श्री. सुभाष रामदास ढोकणे** यांचा समावेश आहे, यांच्या विषयी व्यक्त केलेलं मत, १. आपण मुलांच्या मातृभाषेतील गाणे व खेळ लिहून घेत आहात २. पण मुलांसोबत चांगले उपक्रम घेता ३. आपण पालकांच्या भेटी घेता तसेच **अकोट** तालुक्यातील **शाळा - शहापूर** शाळेविषयी, १. आमची शाळा सुंदर आहे २. आमच्या शाळेतील सर्व शिक्षक मुलांना चांगलं शिकवतात ३. आमच्या शाळेतील काही शिक्षक मुलांना शिकवतांना साहित्याचा वापर करतात **जीतापूर** शाळेविषयी, १. शिक्षक मुलांना चांगलं शिकवतात २. मुलांना लिहिता वाचता येतं ३. गावातील सर्व मुलं नियमित आनंदाने शाळेत येतात **धारूळ** शाळेविषयी, १. आमची शाळा सुंदर आहे २. आमचे सर्व शिक्षक चांगलं शिकवतात ३. पालकांसोबत सतत भेटी होतात ४. शिक्षक प्रत्येक कामात शाळा व्यवस्थापन समितीचे सहकार्य घेतात ५. आमचे शिक्षक एकही मूल शाळाबाह्य राहू नये म्हणून लक्ष ठेवतात **दहीखेड** शाळेविषयी, १. शिक्षक पालकांच्या नेहमी संपर्कात राहतात २. नवीन शाळा असल्याने शिक्षकांना खूप अडचणी आल्या, पण शिक्षकांनी लोकसहभाग घेऊन अडचणींवर मात केली ३. शिक्षकांचे व्यवस्थापन चांगले आहे, म्हणून शाळेतील उपस्थिती पूर्ण असते **मलकापूर** शाळेविषयी, १. आमची शाळा सुंदर आहे २. आमच्या शाळेतील सर्व मुलांना लिहिता वाचता येतं ३. आमच्या शाळेत शाळाबाह्य मुलांवर लक्ष ठेवले जातं ४. शाळेतील शिक्षक शिकवतांना कोरकू भाषेचा वापर करतात ५. मुलांची शैक्षणिक प्रगती चांगली आहे, मुलं आनंदाने शिकवतात ६. आमचे शिक्षक पालकांच्या नियमित भेटी घेतात ७. गावातील लोक गावाच्या शैक्षणिक परिस्थितीविषयी समाधानी आहेत आणि **शिक्षक - कासोद अमोना** शाळेतील **सहाय्यक शिक्षिका श्रीमती. प्रतिभा विजय देशमुख,** यांच्याविषयी १. आपण मुलांना चांगलं शिकवतात २. आपल्या वर्गातील मुलांना लिहिता वाचता येतं ३. आपण शाळेत वेळेवर येतं व जाता **सोमठाना शाळेतील सहय्यक शिक्षक श्री. अमोल रमेश कळसकर** यांच्याविषयी, १. आपण मुलांना चांगलं शिकवता २. आपण शाळेत वेळेवर येता व जाता ३. आपण पालकांच्या नेहमी संपर्कात असता, अशाप्रकारे लोकांना आपले मत व्यक्त केले. तेल्हारा तालुक्यातील दोनच शाळा आहेत, तसेच अकोट मधील अजून काही शाळा व शिक्षक आहेत, त्यांचा सत्कार फेब्रुवारी महिन्यात करणार आहोत, आणि त्यांची माहिती जानेवारीच्या अंकात प्रसारित करू.